पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## प्रेसनोट क्रमांक - ६८७ दिनांक - १३/०९/२०२३

### अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा संयुक्त कारवाई

### पुणे शहर पोलीस आयुक्त कार्यक्षेत्रातील एकुण २१ पोलीस ठाण्यात जप्त करण्यात आलेले ४,७५,५३,०००/- रु किचे अंमली पदार्थ राजंणगांव येथील एमईपीएल कंपनीचे भट्टी मध्ये केला नाश

भारत सरकार अर्थ मंत्रालय,महसुल विभाग,नवी दिल्ली,यांनी जारी केलेल्या अधिसुचना नुसार तसेच महाराष्ट्र शासन गृहविभाग (विशेष) यांचेकडील अधिसुचना व त्यातील तरतुदीनुसार तसेच मा.अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग महाराष्ट्र राज्य यांचे परिपत्राकानुसार दिनांक १२/०९/२०२३ रोजी पुणे शहर पोलीस आयुक्तालयातील मुद्देमाल नाश कमिटीचे अध्यक्ष मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,पुणे शहर,श्री.रामनाथ पोकळे, सदस्य मा.पोलीस उप-आयुक्त गुन्हे,श्री.अमोल झेंडे, सदस्य मा.पोलीस उप आयुक्त मुख्यालय,श्री.रोहिदास पवार, सहा.रासायनिक विश्लेषक,श्री.जि.भ.सदाकाळ, वैज्ञानिक सहाय्यक प्रादेशिक न्यायवैद्यकीय प्रयोगशाळा पुणे,श्री.प्र.अ.लेंडे, क्षेत्र अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,पुणे, श्री.प्रमोद डोके, निरीक्षक,राज्य उत्पादन शुल्क,बी.विभाग, श्री.विठ्ठल बोबडे,निरीक्षक राज्य उत्पादन,शुल्क,जी विभाग,श्री,एस.के.कोल्हे असे कार्यक्षेत्रातील एकुण २१ पोलीस ठाणे मध्ये अंमली पदार्थ कायदयानुसर दाखल असणारे ८० गुन्हयामधील, जप्त करण्यात आलेले गांजा.एम.डी. कोकेन.हेरॉईन, पॉपीस्ट्रॉ,चरस असा ४,७५,५३,०००/- (०४ कोटी ७५ लाख ५३ हजार) रुपये किचा अंमली पदार्थ मुद्देमालनाश कमिटी समक्ष राजंणगांव येथील एमईपीएल कंपनीचे भट्टी मध्ये नाश करण्यात आला आहे.

त्यामध्ये ३३८ किलो ९०१ ग्रॅम २९१ मिलीग्रॅम गांजा, किं.रु.६७,७८,०२०/- चा, ०१ किलो ११४ ग्रॅम ४८१ मिलीग्रॅम एम.डी.किं.रु. १,६७,१७,२१५/- चा, ०१ किलो ४२६ ग्रॅम २९९ मिलीग्रॅम कोकेन किं.रु. २,१३,९४,४८५/- चा, ०१ किलो ९६६ ग्रॅम चरस किं.रु.१९,६६,०००/-चा, २८ किलो ७५३ ग्रॅम पॉपीस्टॉ किं.रु.२,८७,५३०/- चा, १३६ ग्रॅम ६२४ मिलीग्रॅम हेराईन किं.रु ४,०९,८७२/- असा एकुण ४,७५,५३,०००/- (०४ कोटी ७५ लाख ५३ हजार) रुपये किचा अंमली पदार्थ समाविष्ट आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.सह पोलीस आयुक्त,श्री. संदिप कर्णिक यांचे मार्गदर्शन व सुचनानुसार मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,पुणे,श्री.रामनाथ पोकळे, मा. पोलीस उप-आयुक्त,गुन्हे,श्री.अमोल झेंडे, सदस्य पोलीस उप आयुक्त मुख्यालय,पुणे,श्री.रोहिदास पवार यांचे उपस्थितीत पोलीस निरीक्षक,अश्विनी सातपुते. सुनिल थोपटे, आनंदराव खोबरे, सहा.पोलीस निरीक्षक, शैलजा जानकर, लक्ष्मण ढेंगळे, पोलीस उप निरीक्षक,शुभांगी नरके, दिगंबर चव्हाण, सहा.पोलीस उप निरीक्षक,सुजित वाडेकर, ज्ञानेश्वर घोरपडे, शिवाजी घुले, पोलीस अंमलदार,राहुल जोशी, संतोष देशपांडे, पांडुरंग पवार, मनोजकुमार साळुंके, विशाल दळवी, संदिप शिर्के, प्रविण उत्तेकर, मारुती पारधी, संदिप जाधव, मयुर सुर्यवंशी, रविंद्र रोकडे, चेतन गायकवाड,प्रसाद बोमादंडी, विशाल शिंदे, सचिन माळवे, रेहाना शेख, दिशा खेवलकर,स्वाती राऊत सविता कळस्कर, संदेश काकडे, संदिप शेळके, साहिल शेख, अजिम शेख, युवराज कांबळे, योगेश मोहिते, योगेश मांढरे, नितीन जगदाळे, नितेश जाधव, दिनेश बास्टेवाड यांनी केली आहे.